नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २१/०९/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण २७,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक २१/०९/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, १० चक्का ट्रॅक व २ बोलेरो वाहनामध्ये काही लोक कुही कडून वडोदा कडे अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने करीत आहे. अशा खबरेवरून दिनांक २१/०९/२०२२ चे ०२.०० वा. सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बडोदा येथे नाकाबंदी करून तिन्ही वाहन क्र. एमएच— ४०/एके—५६७९, एमएच— ४०/सिडी— ४९०६ व एमएच—४०/बीएल— ३७६२ क्रमांकाच्या दहा चाकी ट्रकची पाहणी केली केली असता त्यात तीन इसम बसलेले दिसले व वाहनाचे पाठी मागिल डाल्यात गोवंश जातीचे ४७(गाय,बैल) जनावरे कोंबुन भरलेले दिसले. आरोपी क्र. १. आकाश मुलचंद गडकरी, वय २० वर्ष, रा. केसलवाडा वाघ, ता. लाखनी, भंडारा, २. विशाल विलास उताने, वय २० वर्ष, रा. लावेश्वर, भंडारा व ३. अब्दुल वसी अब्दुल अलीम, वय ३६ वर्ष, रा. भाजीमंडी, कामठी यांच्या ताब्यातुन जनावरे एकुण किमंती ४,७०,०००/—रूपयाचे व तिन्ही वाहन कि. २३,००,०००/—रू. असा एकुण कि. २७,७०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीतांविरूद्ध पोलिस स्टेशन मौदा येथे अप.क्र. ६१६/२०२२ कलम कलम ११, ११(१),११(१)(अ),११(१)(बी),११(१)(ई),११(१)(एफ) प्रा.नि.वाग.प्र.अधि.१९६० सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १८८, ४२९, १०९ भादवी तसेच १८४ मोवाका कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तीन आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास सपोनि सोनेकर मो.क्र. ८९७५८२१७७० हे करित आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि भारत श्री थिटे, पोहवा विनोद, नाना राउत, अरविंद भगत, पोना अजीज, बालाजी, चालक पोशि आशुतोष यांचे पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर